तरुण भारत बुधवार, दि. ९ जानेवारी २०१९

# दिव्यांगांकडे सहायकाच्या भूमिकेतून पहावे

## डॉ. राजेंद्र हिरेमठ यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात दिव्यांग हक्क कायदा कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी भरारी घेतली आहे. दिव्यांगाकडे समाजाने सहायकाची भूमिकेतून पहावे. त्यातून दिव्यांग देश घडवण्यामध्ये निश्चितपणे हातभार लावतील, असे प्रतिपादन सावित्रीबाई पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र-समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यु.जी.सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ब्रेल दिनी 'दिव्यांग हक्क कायदा २०१६' वर कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख



पाहुणे म्हणून बोलत होते. छ.राजर्षी शाहू सिनेट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी सेंटर फॉर इन्क्लुझिव्ह एज्युकेशन आणि अक्सेसिबिलिटी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील समन्वयक धनंजय भोळे होते.

पुढे डॉ. हिरेमठ म्हणाले, दिव्यांगांना अधिकार प्रदान करण्याचे मोठे कार्य सरकारने सुरु केले आहे. मनामध्ये दिव्यांगांप्रती वेगळेपणाची असलेली भावना नष्ट झाल्यानंतर ही दरी कमी होणार आहे. तयासाठी सर्वसामान्यांमध्ये जाणीवजागृती आवश्यक आहे. क्षमता आणि पात्रतेचा विचार केला तर दिव्यांग सर्वसामान्यांपेक्षा वेगळे नसल्याचे त्यांनी सांगितले.

हेल्पर्स ऑफ दी हॅन्डीकॅपच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक म्हणाल्या, दिव्यांगांना कायद्याने प्राप्त झालेले हक्क सर्वच क्षेत्रामध्ये अंमलात आणले जावेत, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. कायद्याने दिव्यांगांना समान संधी, हक्क आणि संरक्षण प्राप्त होण्यासाठी मदत झालेली आहे.

अडचणींकडे संधी म्हणून पाहून नवी दृष्टी निर्माण करण्यासाठी दिव्यांगांना बळ देणे गरजेचे आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामुहीक प्रयत्न केल्यास जगामध्ये ते आदर्शवत होतील. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये दिव्यांगांना सहजपणे वावरता येईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. योग्य वयात दिशा मिळाली तर समाजामध्ये त्यांचे जगणे सुसह्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिव्यांगांच्या कार्य कौशल्याचा समावेश असलेल्या 'गगनाला पंख नवे' व 'दिव्यांगज' लघुचित्रफीत दाखवण्यात आली. याप्रसंगी, डॉ. अंजली निगवेकर यांची संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

संयोजक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.